IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue II, (April - June) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# आंबेडकर आणि ग्राम्शी यांच्या मुक्तीवादी विचारांचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. प्रविण बोरकर,**
सहयोगी प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग, आर. के. तलरेजा कॉलेज, उल्हासनगर

**Article Info**

***Article History:***
Received: 19th April 2026
Accepted: 29th April 2026
Published: 02nd May 2026

***Keywords:***

*जातिव्यवस्था, वर्चस्व, सांस्कृतिक प्रभुत्त्व, सेंद्रिय बुद्धिवंत, दलित, सबाल्टर्न, वंचित*

**ABSTRACT**

वंचित समुदायाचे विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अंतोनिओ ग्राम्शी हे वैश्विक पातळीवर महत्त्वाचे आहेत. या दोन्ही विचारवंतांच्या विचारांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा उद्देश त्यांच्या संबंधित अनुभवांना, वैयक्तिक इतिहासाला व शोषित कर्तृत्त्वाच्या जडणघडणीविषयाच्या त्यांच्या सैद्धांतिक मांडणीला समजून घेण्यासाठी त्यांना एकाच पातळीवर आणणे हा आहे. अनुभवाच्या व वैचारिक पातळीवर बघता आंबेडकर आणि ग्राम्शी यांच्यात अनेक साम्यस्थळे आढळून येतात. त्यांचे विचार हे त्यांनी प्रत्यक्ष जगलेल्या अनुभवातून आणि कार्य करण्यात व्यतीत केलेल्या सक्रीय जीवनातून उगम पावतात. या दोन्ही विचारवंतांच्या विचारांमध्ये प्रामाणिकता आणि ध्येयाप्रतीची निष्ठा दिसून येते. या दोन्ही विचारवंतानी शोषणाची व्यवस्था, जातीय व सांस्कृतिक प्रभुत्त्व, धर्मव्यवस्था, शिक्षणाचे महत्त्व, बुद्धीजीवींची भूमिका व सामाजिक चळवळ आणि नागरी समाज याद्वारे मांडलेले विचार दलित व सबाल्टर्न वर्गाची स्थिती दर्शवणारे असून त्याद्वारे जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. दोन्ही विचारवंतांना त्यांच्या त्यांच्या ऐतिहासिक संघर्षाच्या जात आणि वर्गाच्या पार्श्वभूमीवर बघितले असून तशी मांडणी केली आहे. हा शोधनिबंध जातिव्यवस्थेतून आणि सांस्कृतिक प्रभूत्त्वातून मुक्ततेसाठी आंबेडकर आणी ग्राम्शी यांनी सुचवलेल्या उपायांचा वेध घेतो.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: April 29, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** ***Pravin Borkar (2026)**, आंबेडकर आणि ग्राम्शी यांच्या मुक्तीवादी विचारांचा तुलनात्मक अभ्यास. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 2(II), 3232–3237.*

**प्रस्तावना :**

आधुनिक काळाच्या संदर्भात डॉ. आंबेडकर आणि अंतोनिओ ग्राम्शी दोन्हीही विचारवंत महत्त्वाचे आहेत. त्यांचे जीवन, लेखन व कार्यामुळे सर्वदूर त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. आंबेडकर त्यांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायाच्या भूमिका, जातिव्यवस्थाविरोधी मांडणी व संविधान निर्मितीसाठी ओळखले जातात तर ग्राम्शी त्यांच्या हेजिमनी, सांस्कृतिक प्रभुत्त्व, नागरी समाज व सेंद्रिय बुद्धिवंत या मांडणीसाठी मान्यता पावलेले आहेत. आंबेडकर आणि ग्राम्शी त्यांच्या स्पष्ट आणि सडेतोड भूमिका व लेखनासाठी ओळखले जातात. आंबेडकर आणि ग्राम्शी फक्त अकादमिक क्षेत्रातच नाही तर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही महत्त्वाचे ठरतात. ते दोघेही समकालीन होते. आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी भारताच्या मध्यप्रदेशातील 'महू' येथे झाला तर ग्राम्शीचा जन्म २२ जानेवारी १८९१ रोजी इटलीतील सार्डिनिया बेटावरील 'अलेस' येथे झाला. दोघेही परस्परांपासून दूर असलेल्या भौगोलिक क्षेत्रातील होते. दोघांच्या देशातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती, दोघांनाही स्वतःच्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला, आंबेडकरांना जातिव्यवस्थेचे चटके सहन करावे लागले तर ग्राम्शीला भांडवली हुकुमशाहीचे. आंबेडकरांनी त्यांचे उच्च शिक्षण 'कोलंबिया विद्यापीठ', अमेरिका, 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स', इंग्लंड, 'ग्रेज इन', लंडन इथून घेतले तर ग्राम्शीने त्याचे उच्चशिक्षण इटलीच्या 'तुरीन' विद्यापीठातून घेतले. दोघांनीही अत्यंत वेगळ्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात काम केलेले असले तरी दलित/उपेक्षित समूहाच्या उत्थानासाठी, सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेली मांडणी व कार्य महत्त्वाचे आहे. या दोघांच्या कार्याला सैद्धांतिक जोड होती आणि ती त्यांच्या स्वतःच्या व इतरांच्या उपेक्षित जीवन व अनुभवातून निर्माण झाली होती त्यामुळे महत्त्वाची ठरते.

**अभ्यासाचे महत्त्व :**

आंबेडकर आणि ग्राम्शी यांचा तुलनात्मक केलेला अभ्यास अनेक अंगाने महत्त्वाचा आहे. हे दोघेही विचारवंत अतिशय दूरवरच्या प्रदेशातील होते, त्यांची कधी भेटही झालेली नव्हती, त्यांच्यापुढील प्रश्न व समस्या वेगळ्या होत्या, तरीही त्यांनी दलित व सबाल्टर्न समूहांच्या संदर्भात जी मांडणी केलेली आहे, ती त्यांना वैचारिकदृष्ट्या जवळ आणण्याचे कार्य करते. सांस्कृतिक प्रभुत्त्व व वर्चस्व, शोषण, धर्म, शिक्षण, बुद्धीजीवी या विषयावरील दोघांच्या मांडणीत साधर्म्य आढळून येते. आंबेडकर व ग्राम्शी या दोघांनी केलेली मांडणी ही त्यांच्या व्यक्तिगत जीवनानुभावातून केलेली असल्याने ती महत्त्वाची असून आंबेडकर व ग्राम्शी यांच्यातील संवादासाठी महत्त्वाची आहे. कोसिमो झेन लिहितात, "माझा युक्तिवाद असा आहे की, ग्राम्शी आणि आंबेडकर या दोघांच्याही बाबतीत नागरी, लोकशाही समाजात वगळलेल्यांचा समावेश हा राजकीय सहभागाचा केवळ एक जोडभाग नसून, तो त्याच्या गाभ्याशीच संबंधित आहे, कारण जोपर्यंत मानवजातीचे काही सदस्य, कोणत्याही कारणास्तव, विविध स्तरांवर, जगाच्या कोणत्याही भागात मानवतेचा भाग होण्यापासून वगळलेले राहतात, तोपर्यंत ही मानवता अपूर्ण आहे आणि राजकीय संघर्ष सुरूच राहिला पाहिजे. म्हणूनच, ग्राम्शी-आंबेडकर भेटीचे महत्त्व 'दक्षिणेकडील प्रश्न' किंवा दलित मुक्तीच्या पलीकडे, आणि खरे तर इटली व दक्षिण आशियाच्याही खूप पलीकडे जाते. (झेन, २०१३, पृ. ४-५) त्यामुळेच आंबेडकरांच्या कार्याला मान्यता देण्यासाठी ग्राम्शींचा संदर्भ देणे आणि ग्राम्शींच्या मांडणीला भारतीय परिप्रेक्षात बसवणे हा या लेखाचा हेतू नाही तर जातीच्या प्रश्नावरील आंबेडकरांच्या मौल्यवान योगदानाची पुष्टी करण्याबरोबर ग्राम्शींच्या सांस्कृतिक प्रभुत्त्वाच्या सिद्धांताचे महत्त्व विशद करून दोघांनी सुचविलेल्या मुक्तीच्या उपायांचा मागोवा घेणे हा सुद्धा आहे.

**वैचारिक पार्श्वभूमी :**

आंबेडकरांनी बुद्ध, कबीर आणि महात्मा फुल्यांना गुरु मानले व त्यांच्यावर अमेरिकन तत्त्वज्ञ जॉन ड्युई यांचा प्रभाव होता, तर ग्राम्शीला मार्क्सवादातून प्रेरणा मिळाली व त्यांच्यावर लेनिन, बेनेदेतो क्रोचे, निकोलो मॅकियावली यांचा प्रभाव होता. दोघांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक चिकित्सक विश्लेषणाच्या माध्यमातून उपेक्षित घटकांचे अस्तित्त्व तपासले आणि राज्य, समाज व इतिहास/इतिहासलेखन यांमध्ये या 'वगळलेल्या' व्यक्तींना योग्य स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. याअनुषंगाने आंबेडकरांचे विचार त्यांच्या 'ॲनिहीलेशन ऑफ कास्ट', रिडल्स ऑफ हिंदुझम' या ग्रंथाद्वारे व्यक्त झाले आहेत तर ग्राम्शीचे विचार त्यांच्या 'प्रिझन नोटबुक्स्' या ग्रंथातून प्रामुख्याने व्यक्त झालेले आहेत. इतर बाबतीत पूर्ण वेगळे असलेले आंबेडकर आणि ग्राम्शी राजकीय अनुभव, तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी आणि परिणामकारक धोरणाविषयीच्या कल्पनांच्या बाबतीत समान दिसतात. दलित/उपेक्षित घटकांविषयी असलेली त्यांची मानवी आणि राजकीय बांधिलकी परस्परांना जवळ आणते. आंबेडकरांची सामाजिक आणि नैतिक जाणीव तर ग्राम्शीची बौद्धिक आणि नैतिक सुधारणा या संकल्पना परस्परांमधील साम्य दर्शवितात. समस्येचे समाधान हे उपेक्षित घटकांनी स्वतःच्या प्रयत्नांतून स्वतःच्या जीवनाचे सक्रिय शिल्पकार बनून 'जाणीव' आणि 'सामूहिक इच्छाशक्ती' प्राप्त करण्यात आहे असे दोघांनाही वाटते. इटलीत ग्राम्शीवर गंभीर अभ्यास केला गेला पण भारतात आंबेडकरांना विचारवंत म्हणून स्थापित व्हायला वेळ लागला. कांचा इलाया शेफर्ड यांच्या मते, "ख्रिस्ती लोकांच्या शैक्षणिक संस्थातून इंग्रजी भाषेचे शिक्षण घेतलेल्या ब्राह्मण 'बुद्धिमंतांनी' आंबेडकर यांना अनेक दशके जातिबाह्य 'बुद्धीमंत' असे

वागवले. (आंबेडकर, २०२५, पृ. ३३) आजही भारतात आंबेडकरांच्या विचारांना विशिष्ट दृष्टीकोनातून पाहिले जाते.

**शोषणाची व्यवस्था :**

पारंपारिक मार्क्सवाद शोषण केवळ आर्थिक असते असे मानतो, परंतु आंबेडकर आणि ग्राम्शी शोषण फक्त आर्थिक नसून विविध स्तरावर शोषण केले जाते असे मानतात. शोषण हे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक पद्धतीचेही असते. आंबेडकरांना भारतातील 'जातीव्यवस्था' हे शोषणाचे सर्वात मोठे माध्यम असल्याचे वाटते. जातीव्यवस्था ही केवळ एक सामाजिक विभाजनाची व्यवस्था नसून ती धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक अवस्था असून ती बहुस्तरीय शोषण करते. आंबेडकर लिहितात, "जातिव्यवस्था ही फक्त एक श्रमाच्या विभागणीची व्यवस्था नाही. ती श्रमिकांचेही विभाजन करणारी व्यवस्था आहे." (आंबेडकर, २०२१, २०५) ग्राम्शी यांनी 'हेजिमनी' या संकल्पनेद्वारे वर्गसत्तेचे विश्लेषण केले आहे. भांडवलशाहीत भांडवलदार कामगारांचे शोषण करतो, हे मार्क्सवादी तत्त्व ग्राम्शी यांना मान्य आहे. प्रभुत्त्व निर्माण करतांना शासक वर्ग बळ व संमतीचा वापर करतो. ग्राम्शीच्या मते, धुरीणत्त्व किंवा प्रभुत्त्व हे दोन पद्धतीने प्राप्त करता येते. बळाच्या आणी संमतीच्या आधारावर ते प्राप्त करता येते. (ग्राम्शी, १९७१, पृ. ५७) उच्चवर्णीय समूह धर्म, रूढी, परंपरा व संस्कृतीच्या माध्यमातून खालच्या जातीतील लोकांवर वर्चस्व टिकवून ठेवतात व त्या वर्चस्वाचा स्वीकारही केला जातो. यावर भाष्य करताना कांचा इलाया शेफर्ड लिहितात की, "आंबेडकर यांच्या समकालीन विद्वानांनी - आणि त्यात दलित विद्वानही आले - असेच मानले की, मागासलेले लोक व त्यांच्याही खालच्या पातळीवरील गणले गेलेले इतर मागासवर्गीय लोक हे हिंदू धर्माच्या सांस्कृतिक किंवा धर्मग्रंथीय वारशाचा एका हिस्सा आहेत." (आंबेडकर, २०२५, पृ. ३३) यावरून संमतीच्या आधारे भारतातील सांस्कृतिक जातीय प्रभुत्त्व कसे टिकून आहे हे लक्षात येते. भांडवलशाहीत शासक वर्ग किंवा प्रत्येक वर्ग साहित्य, कला, संस्कृती आणि तत्त्वज्ञान इत्यादींच्या माध्यमातून आपले प्रभुत्त्व निर्माण करतात. भांडवलशाहीत सत्ताधारी वर्ग केवळ कायदा, सैन्य व पोलिसांचा वापर करून प्रभुत्त्व टिकवून ठेवत नाही तर तो संमतीच्या आधारेही आपले प्रभुत्त्व टिकवून ठेवतो. आंबेडकर आणी ग्राम्शी दोघांनीही शोषणाची व्यवस्था वैचारिक व सांस्कृतिक मानली आहे.

**जातीय व सांस्कृतिक प्रभुत्त्व :**

आंबेडकर आणि ग्राम्शी यांच्या वैचारिक प्रवाहांचे साम्य प्रभुत्त्वाच्या प्रश्नावर दिसून येते. विचारसरणी, धर्म आणि सामाजिक संस्था नैतिक अथवा नैसर्गिक व्यवस्थेच्या आडून विषमता कशी टिकवून ठेवतात यावर दोघांनी सैद्धांतिक मांडणी केली आहे. आंबेडकरांनी त्यांच्या 'जातीव्यवस्थेचे उच्चाटन' या पुस्तकात जातीय वर्चस्व किंवा जातीय उतरंड यासंदर्भात केलेली मांडणी दूरदर्शी आहे. वर्णव्यवस्थेतील किंवा जातीव्यवस्थेतील उतरंडीनुसार जातीचे वर्चस्व निर्माण झालेले असून, या उतरंडीत ब्राह्मण सर्वात वरच्या ठिकाणी असून अस्पृश्य किंवा दलित सर्वात खालच्या ठिकाणी आहेत. या उतरंडीनुसारच त्या जातींचा सामाजिक दर्जा तयार झाला आहे. आंबेडकरांच्या मते, "एका बाजूने जातिव्यवस्था माणसांना स्वतंत्र समूहांमध्ये विभागते. दुसऱ्या बाजूने ती या समूहांना सामाजिक दर्जामध्ये एकावर एक रचत श्रेणी तयार करते. प्रत्येक जात ही या जातीय उतरंडीत आपण दुसऱ्या जातीच्या वर आहोत या वस्तुस्थितीत आपला अभिमान आणि समाधान शोधते." (आंबेडकर, २०२१, पृ. २४५-२४६) अश्याप्रकारे एका जातीवर दुसऱ्या जातीचे, खालच्या जातीवर वरच्या जातीचे प्रभुत्त्व किंवा वर्चस्व निर्माण होते व समाज जातीय वर्चस्वाच्या शृंखलेने कार्यरत राहतो. ग्राम्शी यांनी सांस्कृतिक प्रभूत्वाचे सखोल विश्लेषण केलेले आहे, समाजातील सत्ताधारी वर्गाच्या धारणा इतर समाज स्वीकारतो. सत्ताधारी वर्गाचे राहणीमान, खानपान, बोलण्याची भाषा, शैली इत्यादी बाबींचे अनुकरण इतर समाज करू लागतो व एकप्रकारे सत्ताधारी वर्गाच्या सांस्कृतिक प्रभुत्त्वाला संमती देत असतो. त्यांच्या मते, "वर्चस्व म्हणजे, सामाजिक जीवनाच्या सर्वसाधारण दिशेला प्रभुत्त्वशाली गटाने दिलेल्या नेतृत्त्वास मोठ्या जनसमूहांनी दिलेली 'स्वाभाविक' संमती होय." (ग्राम्शी, १९७१, पृ. १२) ही संमती नागरी समाजाच्या विविध संस्थांमधून उदा. शिक्षण, धर्म, कुटुंब, माध्यमे याद्वारे घडवली जाते. ग्राम्शी यांनी चर्च, माध्यमे आणि शिक्षणव्यवस्था यांसारख्या बुर्जुआ संस्थांवर जशी टीका केली, तशीच आंबेडकरांनी हिंदू धर्मग्रंथ आणि पुरोहितशाहीवर टीका करून जाती कशा प्रभूत्त्वाचे साधन बनतात हे उघड केले. आंबेडकरांचा मानवतावाद दलितांना जातीय अस्तित्त्ववादी हिंसेतून मुक्त करण्यासाठी सामाजिक, आध्यात्मिक आणि नैतिक पुनर्रचनेवर भर देतो. त्याचप्रमाणे ग्राम्शींचा मार्क्सवादी मानवतावाद कामगार वर्गाला भांडवलशाही वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी बौद्धिक आणि नैतिक सुधारणेचा मार्ग सुचवतो. आंबेडकर आणि ग्राम्शी दोघांनी मानसिक गुलामगिरीचे सैद्धांतिक विश्लेषण केले असून दोघांनी त्यातील बदलासाठी वैचारिक बदलांवर भर दिलेला आहे.

**धर्मव्यवस्था :**

आंबेडकर आणि ग्राम्शी दोघांनी धर्माची चिकित्सा केलेली आहे. धर्मव्यवस्थेचा व्यक्तीच्या जीवनावर मोठा प्रभाव असतो, त्यामुळे धर्माला बाजूला ठेवून चालणार नाही, याची कल्पना दोघांना होती. भारतीय समाज तर प्रचंड धार्मिक व कर्मठ असल्याने, आंबेडकरांनी हिंदू धर्म, मनुस्मृती, वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेला कठोर टीकेचे लक्ष्य केलेले आहे. हिंदू धर्म व

त्यातील ब्राह्मणी शास्त्र-ग्रंथांनी जातिव्यवस्थेला अधिकृत मानल्याने, पवित्रतेचे स्वरूप दिल्याने जातिव्यवस्था ही सामाजिक आचरणाचा अपरिहार्य भाग बनली. यामुळेच जातीआधारित अन्याय व शोषण हे 'न्याय' ठरले. आंबेडकरांच्या मते, "हिंदू लोक सामाजिक व्यवस्था पवित्र मानतात. जातींना दैवी आधार आहे. म्हणून तुम्ही जातींमधील पावित्र्य आणि दैवीपणावर हल्ला करायला हवा. एकुणात तुम्ही शास्त्रे आणि वेदांचा अधिकार नष्ट करायला हव असा याचा अर्थ आहे." (आंबेडकर, २०२१, पृ. २४२) एकूणच जोपर्यंत ब्राह्मणी आचारधर्माची शास्त्रे (मनुस्मृती आणि वेद) यांचा अधिकार नष्ट होणार नाही तोपर्यंत जाती संपणार नाहीत असे आंबेडकर सूचित करतात. यासंदर्भात कांचा इलाया शेफर्ड यांचे वर्तमानातील निरीक्षण महत्त्वाचे आहे, ते लिहितात, "जातिव्यवस्थेला जे पावित्र्य मिळाले त्यामुळे भारतातच नव्हे तर जगभरात सर्वत्र प्रचंड अशी विषमता निर्माण होण्यास आधार मिळाला. याचे कारण म्हणजे जातीयवादी हिंदू परदेशात - अमेरिका असो, इंग्लंड असो किंवा कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, कॅरिबिअन किंवा दक्षिण आशिया असो - वस्ती करून राहू लागले. जिथे-जिथे ते गेले तिथे-तिथे त्यांनी त्यांची जात बरोबर नेली. (आंबेडकर, २०२५, पृ. ३६) एकप्रकारे जातीचे जागतिकीकरण झाल्याने आंबेडकरांच्या भूमिकेची समर्पकता अधिकच वाढली आहे. धर्म ही सत्ताधारी वर्गाची विचारधारा पसरविण्याचे महत्त्वाचे साधन असल्याने ग्राम्शी यांनी धर्म व चर्च यांचा अभ्यास केला. ग्राम्शी हे धर्माला विचारांचा एक प्रकार, सांस्कृतिक वर्चस्वाचे साधन, सर्वसाधारण ज्ञानाचा भाग व वर्गीय भेद असलेली घटना मानतात. त्यांच्या मते, "जगाची एकसंध, चिकित्सक आणि सुसंगत संकल्पना तयार होण्यापासून रोखण्याच्या लढ्यात कॅथोलिक चर्च ही सर्वात चिवट आणि प्रभावी संघटना राहिली आहे." (ग्राम्शी, १९७१, ३३१-३३२) ग्राम्सी चर्चवर वैचारिक नियंत्रण राखणारी एक वर्चस्ववादी संस्था म्हणून टीका करतात. धर्म एकसमान नसतो; तो विविध वर्गांमध्ये भिन्न असतो आणि सामाजिक उतरंड प्रतिबिंबित करतो-जे सांस्कृतिक वर्चस्व समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. आंबेडकर आणि ग्राम्शी दोघेही धर्माला सामाजिक नियंत्रणाचे माध्यम म्हणून पाहतात. जातीवर्चस्वातून मुक्ततेसाठी आंबेडकरांनी शेवटी समता, बंधुता व मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला तर ग्राम्शी यांनी धर्माऐवजी नविन सांस्कृतिक व नैतिक नेतृत्त्वाची गरज अधोरेखित केली.

**शिक्षणाचे महत्त्व :**

आंबेडकरांच्या दृष्टीने अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी माध्यम होते, त्यामुळे त्यांनी शिक्षणावर भर दिलेला आहे. आंबेडकर स्वतः उच्च विद्याविभूषित होते, त्यांनी अर्थशास्त्र, कायदा अशा विविध क्षेत्रातील पदव्या घेतल्या होत्या. त्यांनी शोषित लोकांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केले. आंबेडकरांनी शिक्षणसंस्था स्थापन करून त्याद्वारे विविध कॉलेज काढलेत. आंबेडकरांच्या मते, "मागासलेल्या वर्गांना आता हे उमगले आहे की, शिक्षण हाच तो सर्वात मोठा भौतिक लाभ आहे, ज्यासाठी ते लढू शकतात. आपण कदाचित भौतिक लाभांचा त्याग करू शकतो...परंतु, सर्वोच्च शिक्षणाचे लाभ पूर्ण क्षमतेने मिळवण्याचा आपला अधिकार आणि संधी, यांचा त्याग आपण कदापि करू शकत नाही. (आंबेडकर, २००५, पृ. ६२) ग्राम्शींच्या लेखनात शिक्षणाच्या विषयाला प्रमुख स्थान आहे. ग्राम्शी शिक्षणाचे असे तत्त्वज्ञान मांडतात जे लोकांना परिपक्व आणि जबाबदार व्यक्ती बनण्यास मदत करते, ज्यामुळे काही निवडक लोकांच्या नव्हे तर सर्वांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळते. ग्राम्शींच्या विचारांमधील शिक्षणाची भूमिका समजून घेण्यासाठी वर्चस्वाची संकल्पना महत्त्वाची आहे, कारण वर्चस्वाचे प्रत्येक नाते अनिवार्यपणे एक शैक्षणिक नाते असते. आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा', असा मूलमंत्र दिला. तर ग्राम्शींच्या 'L'Ordine Nuovo' या साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर 'स्वतःला शिक्षित करा, कारण आम्हाला तुमच्या संपूर्ण बुद्धिमत्तेची गरज आहे. स्वतःला प्रेरित करा, कारण आम्हाला तुमच्या संपूर्ण उत्साहाची गरज आहे. स्वतःला संघटित करा, कारण आम्हाला तुमच्या संपूर्ण शक्तीची गरज आहे. (International Gramsci Society, 2025) असे घोषवाक्य होते. हे घोषवाक्य आंबेडकरांच्या घोषवाक्याशी साम्य दर्शविणारे असल्याने महत्त्वाचे आहे. (झेन, २०१३, पृ. ७) एकूणच आंबेडकर आणि ग्राम्शी दोघांनाही शिक्षण हे मुक्तीचे साधन वाटले, आंबेडकरांना दृष्टीने शिक्षण दलितांमध्ये आत्मसन्मान आणि अधिकारांची जाणीव निर्माण करेल तर ग्राम्शीच्या दृष्टीने शिक्षण शोषित वर्गाला (कामगारांना) सांस्कृतिक संघर्षासाठी तयार करेल.

**बुद्धीजीवींची भूमिका :**

ग्राम्शी यांनी 'सेंद्रिय बुद्धीजीवी' ही संकल्पना मांडली. बुद्धिवंतांनी नैतिक, तात्त्विक, वैचारिक मूल्यांच्या आधारे समाजमानस घडवणे अपेक्षित आहे. त्यासाठी त्यांनी कुठली भूमिका पार पाडली पाहिजे याची मांडणी त्यांनी केलेली आहे. ग्राम्शीं परंपरागत विचारवंत आणि सेंद्रिय विचारवंत किंवा बुद्धीजीवी बुद्धिवंत असा फरक केलेला आहे. बुद्धिवंतांबाबत मांडणी करत असताना ग्राम्शी, "सर्वच माणसे बुद्धिजीवी असतात, पण समाजात सर्वच माणसे बुद्धिजीवींची भूमिका बजावत नाहीत." असे भाष्य केले आहे. (ग्राम्शी, १९७१, पृ. ९) याचा अर्थ शारीरिक कष्टाचे काम करणारी व्यक्तीही विद्यापीठीय अकादमिक व्यक्तीइतकीच सर्जनशील आणि बुद्धिवंत असते, परंतु इतर शारीरिक व कष्टाच्या कामात गुंतल्यामुळे पारंपारिक अर्थाने बुद्धीवंताचे काम पार पडणारे लोक मोजकेच असतात असा आहे. पारंपरिक बुद्धीजीवींमध्ये प्राध्यापक, धर्मगुरू, विद्वान इत्यादींचा

समावेश होतो, हे बुद्धीजीवी तटस्थ असल्याचा दावा करतात परंतु प्रत्यक्षात नकळतपणे विद्यमान सत्ता संरचनांना पाठींबा देतात, त्यामुळे सेंद्रिय बुद्धिवंतांची गरज निर्माण होते. ग्राम्शीने असा युक्तिवाद केला की, प्रत्येक सामाजिक वर्ग स्वतःचे बुद्धिजीवी निर्माण करतो. यांना सेंद्रिय बुद्धिजीवी म्हटले जाते कारण ते एका विशिष्ट वर्गाच्या (विशेषतः कामगार किंवा शोषित वर्गाच्या) जीवनातून, संघर्षातून आणि अनुभवांमधून सेंद्रियपणे उदयास येतात. ते केवळ विद्वान किंवा प्राध्यापक नसतात, तर कार्यकर्ते, शिक्षक, लेखक, समाजातील नेते असतात. सेंद्रिय बुद्धिवंत हे केवळ सैद्धांतिक मांडणी करणार नाहीत तर प्रत्यक्ष तळागळात जाऊन काम करतील. व्यावहारिक कौशल्ये, तांत्रिक कौशल्ये सेंद्रिय बुद्धिवंतांस अवगत असतील. कामगार वर्गासोबत त्या व्यक्तीचे नाते असेल. ग्राम्शी यांच्या मते, "नव्या बुद्धिजीवीचे अस्तित्त्व वक्तृत्वात नाही... तर ते व्यावहारिक जीवनातील सक्रिय सहभागात असले पाहिजे." (ग्राम्शी, १९७१, पृ. १०) ही बुद्धिवंत व्यक्ती कार्यकर्ता आणि विचारवंत या दोहोंचे काम करेल.

आंबेडकर स्वतः दलित समूहाचे सेंद्रिय बुद्धिवंत होते, त्यांनी अस्पृश्यांच्या अनुभवांना वैचारिक स्वरूप दिले. त्यांनी इतिहास, मानववंशशास्त्र, धर्मचर्चा, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, राजकारण या सर्व क्षेत्रातून अस्पृश्यांच्या/दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडली. आंबेडकरांच्या मते, "बुद्धीजीवी वर्ग हा प्रत्येक देशातला सर्वाधिक प्रभावी वर्ग असतो. बुद्धीजीवी वर्ग भविष्याचा अंदाज लावू शकतो. सल्ला आणि नेतृत्त्व देऊ शकेल असा तो वर्ग असतो." आंबेडकर, २०२१, पृ. २४४) आंबेडकरांनी बुद्धीजीवी वर्गाकडून काही अपेक्षा केलेल्या आहेत. हिंदूंमध्ये बुद्धीजीवी वर्ग म्हणून प्राचीन काळापासून ब्राह्मण जातीला मान्यता आहे, परंतु बुद्धीजीवी वर्गाचे अस्तित्त्व एकाच जातीसोबत जोडलेले असावे यावर आंबेडकरांचा आक्षेप आहे. अश्याप्रकारचा बुद्धीजीवी वर्ग जेव्हा जातीसुधारणांच्या विरोधात असतो, तेव्हा जातिव्यवस्था मोडण्याच्या चळवळीला यश मिळण्याच्या शक्यता मला फार दूर वाटतात, असे आंबेडकर नमूद करतात. (आंबेडकर, २०२१, पृ. २४५) यावरून भारतात बुद्धीजीवी म्हणून मान्यता प्राप्त असलेला वर्ग बुद्धीजीवीची भूमिका पार पाडत नाही हे लक्षात येते. त्यामुळेच समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करणारे बुद्धीजीवी आंबेडकरांना अपेक्षित आहेत, हे बुद्धीजीवी खऱ्या अर्थाने परिवर्तनाची धुरा सांभाळू शकतात असा विश्वास त्यांना होता. आंबेडकर आणी ग्राम्शी दोघानांही पारंपारिक बुद्धीजीवी हे सत्ताधारी (सर्व प्रकारच्या सत्ता) वर्गाच्या हितासाठी काम करतात असे वाटत होते त्यामुळेच शोषितांनी/दलितांनी स्वतःचे बुद्धीजीवी निर्माण करावेत यावर भर दिला. त्यांच्या मते, खरा बुद्धीजीवी तोच जो उपेक्षितांच्या/शोषितांच्या बाजूने उभा असतो.

**सामाजिक चळवळ आणि नागरी समाज :**

राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सामाजिक चळवळी तसेच नागरी समाजाची भूमिका महत्त्वपूर्ण असते, याद्वारे समाजमन घडवण्याची प्रक्रीया होत असते व त्याचा मोठा परिणाम एखाद्या मानवी समूहावर व सत्ता प्राप्त करण्यावर होत असतो त्यामुळेच आंबेडकरांच्या नेतृत्त्वातील प्रबोधनाच्या सामाजिक चळवळी तर ग्राम्शी यांच्या संकल्पनेतील नागरी समाज यांना महत्त्वाचे स्थान आहे. आंबेडकरांनी अस्पृश्यांना जागृत करून त्यांच्या मुक्तीचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी विविध संघटना, सभा, समित्या काढल्या. तद्वतच त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत अशी वृत्तपत्रे काढली व त्याद्वारे अस्पृश्य/उपेक्षितांना प्रबोधित करून आंदोलित करण्याचे कार्य केले. आंबेडकरांनी विविध सामाजिक चळवळी उभारल्या व उपेक्षित समुदायांमध्ये समाजभान निर्माण करण्याचे कार्य केले. आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींमुळे अस्पृश्यांना प्रश्नांना वाचा फोडण्यास मदत मिळाली. ग्राम्शी यांच्या विचारांमध्ये नागरी समाजाच्या भूमिकेला महत्त्व आहे. मार्क्सवादी पाया – इमला रचनेतील इमल्यामध्ये नागरी समाजाचा समावेश होतो. ग्राम्शी यांनी इमल्याची नविन व्याख्या करत विधी संघटना, सांस्कृतिक संघटना ते दैनंदिन जीवनाच्या विविध आयामांना सामावून घेणारी रचना या अर्थाने नागरी समाज ही संकल्पना वापरली आहे. नागरी समाज स्थानयुद्धासाठीची भूमी तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका वठवतो, तसेच क्रांती झाल्यावरही सुसंघटित नागरी समाज आवश्यक असतो, असे ग्राम्शी नमूद करतात. आंबेडकर व ग्राम्शी या दोघांच्या मते राजकीय सत्ता मिळवण्यापूर्वी समाजात वैचारिक आणि सांस्कृतिक चळवळ उभारणे आवश्यक असते. आंबेडकरांच्या चळवळींमध्ये हा दीर्घकालीन सांस्कृतिक संघर्ष दिसतो तर ग्राम्शी याला 'स्थानयुद्ध' असे म्हणतात.

अश्याप्रकारे डॉ. आंबेडकर आणि अंतोनिओ ग्राम्शी यांच्या मुक्तीवादी विचारांचा तुलनात्मक अभ्यास महत्त्वाचा आहे. भारताच्या संदर्भात आंबेडकरांचा अस्पृश्य आणि ग्राम्शीचा सबाल्टर्न यांच्यातील तुलना वर्गाधारित मार्क्सवादी चौकटीच्या मर्यादा उघड करते. मार्क्सवाद भौतिकवादी शोषणाची मांडणी करतो परंतु जातिव्यवस्थेचा आधार असणाऱ्या सांस्कृतिक आणि धार्मिक संरचनेकडे दुर्लक्ष करतो. आंबेडकरांना मार्क्सवादाच्या या मर्यादांची कल्पना असल्याने त्यांनी प्रतिप्रभुत्त्व निर्मितीसाठी बौद्ध धम्माचा मार्ग स्वीकारला. ग्राम्शीला बाह्य वर्चस्वाशी संघर्ष करायचा होता त्यामुळे त्यांनी प्रतिसांस्कृतिक प्रभूत्त्वासाठी कामगार वर्गाला जागृत केले तर आंबेडकरांना मात्र बाह्य जातीय वर्चस्वासोबत अंतर्मनातील प्रभुत्त्वासोबतही संघर्ष करायचा होता, त्यामुळे त्यांनी बौद्ध धम्माद्वारे मानसिक बदलासाठीची सांस्कृतिक व्यवस्था स्वीकारली. एकूणच ग्राम्शी आणि आंबेडकर या दोघांनीही दलित/वंचित वर्गाच्या मुक्तीसाठी पर्यायी व्यवस्थेचा पुरस्कार केला.

**निष्कर्ष :**

आंबेडकर आणि ग्राम्शी या दोघांच्या तुलनात्मक अभ्यासातून दलित/वंचित यांच्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन मिळतो. आंबेडकर आणि ग्राम्शी यांनी दलितांच्या/वंचितांच्या संदर्भात कश्याप्रकारची सैद्धांतिक मांडणी केली असून त्यांच्या मुक्तीसाठी कोणत्या मार्गाचा पुरस्कार केला आहे याची माहिती मिळते. दलित/वंचितांचे प्रश्न अव्हेरून राष्ट्रनिर्मिती शक्य नाही व मानवतावाद सुद्धा अपूर्ण आहे हे ही या अभ्यासावरून कळते. या शोधनिबंधाद्वारे दलित/वंचित समूहांचे आवाज ऐकले गेले पाहिजेत, त्यांची पर्यायी संस्कृती निर्माण झाली पाहिजे आणि मानसिक गुलामीतून मुक्तता झाली पाहिजे हा विचार प्रामुख्याने पुढे येतो.

**संदर्भ :**

1. आंबेडकर, बी. आर. (२००५). *डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस*, खंड. २, एडिटेड बाय हरी नरके, महाराष्ट्र गवर्नमेंट
2. आंबेडकर, भी. रा. (२०२१). *जातीव्यवस्थेचे उच्चाटन.* मधुश्री पब्लिकेशन.
3. आंबेडकर, भी. रा. (२०२५). *रिडल्स इन हिंदुइझम.* मधुश्री पब्लिकेशन.
4. इंटरनॅशनल ग्राम्शी सोसायटी. (२०२५) *इंटरनॅशनल ग्राम्शी सोसायटी.*
5. http://www.internationalgramscisociety.org/about_gramsci/chronology.html
6. ग्राम्शी, अं. (१९७१). *सिलेक्शन फ्रॉम प्रिझन नोटबुक्स्.* एडीटेड अँड ट्रान्सलेटेड बाय क्विंटिन होअर अँड जेफ्री नोवेल स्मिथ. इंटरनॅशनल पब्लिशर्ष
7. झेन, सी. (एडिटेड.) (२०१३). *दि पॉलिटिकल फिलॉसॉफीस ऑफ अंतोनिओ ग्राम्शी अँड बी. आर. आंबेडकर : आयटीनेरीज ऑफ दलितस् अँड सबाल्टर्न.* रूटलेज